# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

www.diwanews.com



आता डिजिटल स्वरूपात...
दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरू..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज़ वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com



▶ वर्ष-२ ■ अंक-१९ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, १२ डिसेंबर २०२२ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


# डंम्पींग बंद केल्याची घोषणा केली मात्र प्रत्यक्षात डंम्पींग ग्राउंड बंद करत नाही, आजही दिवा डंम्पींग ग्राउंड सुरूच!



## दिवेकरांची फसवणूक करणाऱ्या ठामपा विरोधात भाजपचे दिवा अध्यक्ष रोहिदास मुंडे यांचा आंदोलनाचा इशारा

**ठाणे: सुमारे एक वर्षांपूर्वी ठाणे महापालिकेची निवडणुक जवळ आली असताना, दिवा डम्पिंग बंद केले सांगता. मात्र अद्यापही दिव्यात कचरा टाकण्याचे थांबवत नाही. आजही डम्पिंग सुरूच आहे. त्यामुळे पहिल्यांदा ५ लाख दिवेकारांची फसवणूक थांबवा, तसेच आठ दिवसात डम्पिंग बंद करा, अन्यथा महापालिका प्रशासनाविरोधात आणि खोटी आश्वासनप्रशासनाविरोधात आणि खोटी आश्वासन देऊन दिवा शहरातील नागरिकांची फसवणूक करणाऱ्या विरोधात दिवावासीयांच्या वतीने आंदोलन करण्यात येईल असा इशारा भाजप दिवा शीळ मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे यांना महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांना निवेदनाद्वारे दिला.**

दिवा शहरात ठाणे महानगरपालिका प्रशासनामार्फत इंपिंग ग्राउंड बंद करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला होता, मागील जानेवारी महिन्यात महापालिका निवडणुकांचे वातावरण तयार झाले, तेव्हा डम्पिंग ग्राउड बंद झाल्याच्या बातम्या वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाल्या होत्या. भंडारली येथे महापालिकमार्फत कचरा प्रक्रिया प्रकल्प सुरू केला आहे. त्यासाठी निधीही खर्च केला आहे. परंतु आजही दिवा शहरात मोठ्या प्रमाणात डम्पिंगच्या गाड्या चालू आहेत. असे मुंडे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. याशिवाय ठाणे शहरातील कचरा दिवा शहरात आजही टाकला जातो. महापालिकेची आश्वासने ही निवडणूकसाठी असतात का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित करताना येथील पाच लाख नागरिकांच्या आरोग्याशी महापालिका म्हणून खेळत असल्याचा आरोपही केला आहे. तर, डम्पिंग बंद झाले सांगून येथील ५ लाख नागरिकांची फसवणूक करत आहात डम्पिंग बंद करतो असे सांगून ते बंद करत नाहीत. दिव्यातील पाच लाख लोकांच्या भावनाशी ठाणे महानगरपालिका प्रशासन खेळत आहे. असेही म्हटले आहे.

तर, महापालिका सत्तेतील दिव्यातील माजी नगरसेवकांच्या दबावापोटी दिव्यातील पाच लाख लोकांची फसवणूक करत आहात का?त्यांना निवडणूकी मध्ये फायदा व्हावा म्हणून डम्पिंग बंद करण्याचे खोटे आश्वासन जनतेला देत आहात. महापालिका आयुक्त म्हणून महापालिकेनेच घेतलेल्या डम्पिंग बंदच्या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करून दिवा शहरातील डम्पिंग ग्राउंड येत्या आठ दिवसात बंद करावा अन्यथा महापालिका प्रशासना विरोधात आणि खोटी आश्वासन देऊन दिवा शहरातील नागरिकांची फसवणूक करणाऱ्या विरोधात दिवावासीयांच्या वतीने आंदोलन करण्यात येईल इशारा भाजपचे मुंडे यांनी निवेदनात दिलेला आहे.



# जिल्ह्यात लम्पी आजाराने ७८ जनावरे दगावली

## ५६ मृत जनावरांच्या पशु पालकांना मदत मिळाली

**ठाणे :** ठाणे जिल्ह्यात आतापर्यंत ७८ जनावरांचा लम्पी आजाराने मृत्यू झाला असून त्यापैकी ५६ जनावरांच्या पशु पालकांना शासनाकडून मदतीचा हात मिळाला असून त्यांच्या खात्यावर मदतीची रक्कम जमा करण्यात येत असल्याची माहिती जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. समीर तोडणकर यांनी दिली आहे.

ठाणे जिल्ह्यातील शहापूर, अंबरनाथ, कल्याण, भिवंडी पाठोपाठ ठाणे शहरातील मुंब्रा परिसरातील जनावरांमध्ये लम्पी आजाराची लागण झाल्याचे आढळून आल्यानंतर जिल्हा पशुसंवर्धन विभागासह स्थानिक स्वराज्य संस्थांतील पशु वैद्यकीय विभागाने कंबर कसत, या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी उपाययोजना करण्यास सुरुवात केली. सध्याच्या घडीला जिल्ह्यात या आजाराने बाधित झालेल्या जनावरांची संख्या थेट ८५९ वर पोहोचली आहे. तर, या आजाराने मृत्यू होणाऱ्या जनावरांची संख्या ७८ वर पोहोचली आहे. या आजारावर ५३५ जनावरांनी मात केल्याने ते आजारातून मुक्त झाले आहे. तर, सध्याच्या घडीला २४६ जणावारांवर उपचार सुरु असून ९ जनावरे गंभीर अवस्थेत असल्यची माहिती पशु संवर्धन विभागाकडून देण्यात आली.

लम्पी त्वचारोगाचा संसर्ग टाळण्यासाठी जिल्ह्यात लसीकरणाचा वेग वाढविल्यामुळे लम्पी त्वचा रोगनियंत्रणात आला आहे. या रोगाने बाधित पशुधनावरील उपचाराचा सर्व खर्च राज्य शासनामार्फत मोफत करण्यात येत असून लसीकरण, उपचार व शवविच्छेदन या सेवा पशुसंवर्धन विभागामार्फत मोफत दिल्या जात आहेत. तसेच मृत पावलेल्या जनावरांमध्ये दुधाळ जनावरांसाठी ३० हजार रुपये, ओढकाम करणाऱ्या जनावरासाठी २५ हजार आणि मृत वासरासाठी १६ हजार रुपये भरपाई देण्यात येणार आहे.

दरम्यान, ठाणे जिल्ह्यात आतापर्यंत ७८ जनावरांचा मृत्यू झाला आहे. या जनावरांच्या पशु पालकांना मदत देण्यासाठीचे प्रस्ताव आल्यानंतर त्या प्रस्तावावर जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी मनुज जिंदल यांच्या अध्यक्षतेखाली समितीच्या बैठकीत ७८ पशु पालकांच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली. त्यानुसार आतापर्यंत ५६ जनावरांच्या पशु पालकांच्या खात्यावर मदतीची रक्कम जमा करण्यात आली असून उर्वरित लाभार्थ्यांच्या खात्यावर लवकरच हि रक्कम जमा करण्यात येत असल्याची माहिती जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. समीर तोडणकर यांनी दिली आहे.








## भंगार गाड्या हटवल्या

**ठाणे:** ठाणे शहरात उड्डाणपुलाखाली तसेच विविध ठिकाणी उभ्या असलेल्या भंगारगाड्या तातडीने हटविण्याचे आदेश महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी महापालिका व वाहतूक विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले होते. त्यानुसार तीन हात नाका उड्डाणपुलाखालील भंगार दुचाकी उचलण्याची कारवाई नौपाडा वाहतूक विभागामार्फत करण्यात आली असून जप्त केलेल्या दुचाकी बाटा कंपाऊंड येथे जमा करण्यात आल्या.






संपादक
सुहास खंडागळे
व्यवस्थापक
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
छायाचित्रकार/प्रतिनिधी
सुदेश सकपाळ
वितरण प्रतिनिधी
संतोष मदने
ऑफिस पत्ता :-
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

## पत्नीच्या हत्येप्रकरणी पतीला जन्मठेप

**ठाणे:** मेव्हण्याने घेतलेल्या पैशांवरुन झालेल्या वादातून पत्नी विमल माळी ( ४८) हिचा खून करणारा पती हिरालाल माळी (५६) याला ठाणे अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्यायाधीश डॉ. रचना तेहरा यांनी बुधवारी दोषी ठरवले. तसेच आरोपी पतीला जन्मठेपेची शिक्षा सुनावली. ही घटना २०१५ मध्ये वर्तकनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. तसेच सरकारी वकील म्हणून सरकारी वकील रेखा हिवराळे यांनी काम पाहिले.

आपल्या भावाकडून उसनवारीने घेतलेले पैसे गावची जमीन विकून दिवाळीच्या आत परत करा, अशी मागणी विमल हिने तिचा पती हिरालाल याच्याकडे केली होती. यातून गुडीपाडव्याच्या आत हे पैसे परत करतो, असे सांगून पत्नीची हिरालालने समजूत घातली होती. मात्र, तरीही ती जोरजोरात भांडत असल्याने रागाच्या भरात हिरालाल याने लोखंडी सळईने पत्नीच्या डोक्यात दोन ते तीन फटके मारले. यात ती जमिनीवर पडल्यानंतर उशिने तिच्या तोंडावर दाब देऊन तिचा खून केला. त्यानंतर घराबाहेर पडून मुलगा रोहित आणि पोलिसांना हिरालालने ही माहिती दिली. ही घटना १३ ऑक्टोबर २०१५ रोजी पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास घडली होती. गुन्हा दाखल झाल्यानंतर वर्तकनगर पोलिसांनी हिरालाल याला अटक केली होती. तपास पूर्ण झाल्यावर न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. हा खटला सुनावणीसाठी न्यायाधीश तेहरा यांच्या समोर आल्यावर सरकारी वकील रेखा हिवराळे यांनी सादर केलेले पुरावे आणि साक्षीदारांची साक्ष ग्राह्य मानून ठाणे सत्र न्यायालयात ७ डिसेंबर २०२२ रोजी आरोपीला दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली. याप्रकरणी तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक के. जी. गावीत यांनी तपासी अधिकारी तर पैरवी अधिकारी म्हणून करुणा वाघमारे यांनी काम पाहिले.

## फिर्यादीने कथित आरोपीस दहा हजार रुपये भरपाई द्यावी; ठाणे न्यायालयाने दिले आदेश

**ठाणे:** लैंगिक अत्याचारासारख्या गुन्ह्यात फिर्यादी महिलेच्या वकिलांनी न्यायालयाबाहेर तडजोड झाल्यास अटकेतील कलामुद्दीन ऐहतशामुद्दीन शेख (३३) यांना जामीन मंजूर करण्यास हरकत नसल्याचे प्रतिज्ञापत्र न्यायालयात सादर केले. याचदरम्यान सरकारी वकील संजय मोरे यांनी अशा प्रकरणांना आळा बसला पाहिजे, अशी आरोपीची बाजू मांडली. ठाणे जिल्हा अतिरिक्त न्यायालयाचे न्यायाधीश अमित शेटे यांनी याविषयी कठोर दखल घेऊन निरीक्षण नोंदवताना, कथित आरोपीचा जामीन मंजूर करत, फिर्यादी महिलेला अटकेत असलेल्या शेख यांना पुढील दोन आठवड्यात १० हजार रुपये भरपाई म्हणून अदा करण्याचे आदेश दिले. हे आदेश गुरुवारी दिल्याची माहिती सरकारी वकील मोरे यांनी दिली.

शेख यांच्यावर लैंगिक अत्याचाराच्या आरोपाखाली गुन्हा मुंब्रा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. त्याचदिवशी कासारवडवली पोलिसांनी शेख यांना त्या गुन्ह्याखाली अटक करत तपास सुरू केला. दरम्यान शेख यांनी ठाणे न्यायालयात जामीनासाठी अर्ज केला. त्याच्यावर सत्र न्यायालयाचे न्यायाधीश शेटे यांच्या समोर हे प्रकरण सुनावणीसाठी होते. त्या सुनावणीच्या वेळेस फिर्यादींच्या वकीलांनी या प्रकरणात न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याने शेख याला जामीन मंजूर करण्यास हरकत नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले, शेख हे १८ नोव्हेंबर २०२२ रोजी पासून अटकेत आहे. शेख अटकेत असल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन बंद झाले. याचा परिणाम त्यांच्या कुटुंबीयांना सोसावे लागले, याची दखल घेऊन न्यायालयाने शेख यांना जामीन मंजूर करत, फिर्यादी महिलेने त्यांना दहा हजार भरपाई अदा करावी अन्यथा तपास अधिकाऱ्यांनी फिर्यादी महिलेविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करावी,असे आदेश दिले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com
सोमवार, १२ डिसेंबर २०२२


## माजी उपमहापौर रमाकांत मढवी यांच्या हस्ते रस्ता कॉंक्रीटीकरणच्या कामाचा शुभारंभ



### डीजे कॉम्प्लेक्स मधील नागरिकांची गैरसोय होणार दूर

**दिवा:–** बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे दिवा शहरप्रमुख रमाकांत मढवी यांच्या प्रमुख उपस्थितीत साबे गावातील डीजे कॉम्प्लेक्स परिसरात अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरणाच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निधीतुन व खासदार श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नाने सदर कॉंक्रीटीकरण चे काम होत असल्याची माहिती रमाकांत मढवी यांनी दिली.या रस्त्याच्या कामासाठी माजी उपमहापौर रमाकांत मढवी , सौ.दिपालीउमेशभगत यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याचे नागरिकांनी सांगितले. डी.जी.कॅाम्प्लेक्स बिल्डींग नं ०२ ते यशोदा पाटील अपार्टमेंट पर्यंत अंतर्गत रस्ता कॅांक्रिटीकरणाचा सुभारंभ उपमहापौर रमाकांत मढवी यांच्या हस्ते पार पडला.यावेळी उपस्थित विभागप्रमुख उमेश भगत,ड. आदेश भगत,निलेश पाटील ,विभागप्रमुख गुरुनाथ पाटील,अर्चना पाटील,दिगंबर भोईर,किरण मढवी,अंकलेश पाटील,अविनाश गुरव,मुन्ना भोईर आदी मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते.

# बनावट फेसबुक अकाउंट द्वारे शैलेश पाटील यांची बदनामी, आक्रमक कार्यकर्त्यांचा दिवा पोलीस चौकीला घेराव!



**दिवा:–**दिव्यातील बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे उपशहर प्रमुख माजी नगरसेवक शैलेश पाटील यांची फेसबुकवर बनावट अकाउंट काढून बदनामी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी यासाठी शैलेश पाटील यांच्या समर्थकांनी सोमवारी दिवा पोलीस चौकीला घेराव घातला. यावेळी पोलिसांनी बनावट अकाउंट चालवणाऱ्यावर लवकरच कारवाई करण्यात येईल असे आश्वासन नागरिकांना दिले.

यावेळी शैलेश पाटील यांचे कार्यकर्ते जयसिंग कांबळे,बीबीशन गायकवाड, सुमित मोरे, राजू कांबळे,पंकज बोबडे,गजरे,महिला कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होते. मागील काही दिवसांपासून हिशोब दहा वर्षाचा या बनावट फेसबुक अकाउंट वरून शैलेश पाटील यांचे राजकीय विरोधक जाणीवपूर्वक त्यांची बदनामी करत आहेत. दिवा शहरात आठ नगरसेवक मागील पाच वर्षे होते. तसेच आमदार,खासदार असे दिवा शहराचे इतर लोकप्रतिनिधी देखील काम पाहत असताना शैलेश पाटील यांनाच दिव्यातील समस्यांना जबाबदार धरून एकतर्फी टार्गेट करणाऱ्याचा हेतू समोर येणे आवश्यक आहे असे शैलेश पाटील यांच्या समर्थकांचे मत आहे. बदनामी करणाऱ्या बोगस फेसबुक अकाउंट वर तातडीने कारवाई करावी अशी मागणी शैलेश पाटील यांच्या समर्थकांनी केली. दिव्यात शिवसेनेचे आठ नगरसेवक निवडून आलेले असताना याशिवाय दिव्यात शिवसेनेचे माजी उपमहापौर राहिले असताना आठपैकी अन्य कुणालाच दिव्यातील समस्यांना जबाबदार धरले जात नाही,फक्त शैलेश पाटील यांनाच टार्गेट केले जात असल्याने शैलेश पाटील यांचे समर्थक आक्रमक झाले आहेत. याबाबत बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे शहर प्रमुख रमाकांत मढवी यांनीही नेमका विकास झाला आहे की नाही याबाबत भूमिका स्पष्ट करावी अशी मागणी आता शैलेश पाटील यांचे समर्थक करत आहेत.जर दिव्यात विकास झाला नाही असे बनावट अकाउंट काढणाऱ्या व्यक्तीचे म्हणणं असेल तर त्याला सर्व नगरसेवकांना जबाबदार धरायला हवे होते, मात्र फक्त शैलेश पाटील यांच्यावर टीका केल्याने हा प्रकार कोणी जाणीवपूर्वक करताय का?शैलेश पाटील यांची प्रतिमा ममलिन करण्याचा हा प्रयत्न आहे का? असा संशय शैलेश पाटील यांचे समर्थक व्यक्त करत आहेत. शैलेश पाटील यांची बदनामी करणारी व्यक्ती शोधून काढली नाही तर दिव्यात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शैलेश पाटील यांच्या समर्थकाने दिला आहे.



## ज्योती पाटील यांच्या वतीने आधार कार्ड शिबिराचे आयोजन

**दिवा:–**भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा व तन्वी फाउंडेशनच्या वतीने दिवा येथे बी आर नगर भागात नवीन मतदार नोंदणी व आधार कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय जनता पार्टीच्या महिला अध्यक्षा ज्योती पाटील यांनी या शिबिराचे आयोजन केले होते.या शिबिराचा विभागातील शेकडो नागरिकांनी लाभ घेतला.



# म्हात्रे आळी–साईबाबा मंदिर येथील रस्ता व गटाराच्या कामाला सुरुवात

## शैलेश पाटील व अमर पाटील यांची उपस्थिती






**दिवा:–** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरसेवक शैलेश पाटील, नगरसेवक अमर पाटील, नगरसेविका दिपाली भगत यांनी महापालिका महासभेत मंजुर करुन घेतलेल्या दिवा गावातील म्हात्रे आळी येथील साईबाबा मंदिर ते सदगुरु कृपा बेकरी येथील रस्ता व गटाराच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी मा.नगरसेवक शैलेश पाटील, मा.नगरसेवक अमर पाटील, विभागप्रमुख भालचंद्र भगत, परिसरातील रहिवाशी वामन म्हात्रे, श्रीराम पाटील, सुनिल म्हात्रे, अजय म्हात्रे, संतोष म्हात्रे, शैलेश म्हात्रे, नरेश भोईर, मंगेश भगत व इतर रहिवाशी उपस्थित होते.

# रस्ते पाहणीदरम्यान अधिकाऱ्यांची महापालिका आयुक्तांकडून झाडाझडती

## रस्त्यांची कामे कालमर्यादेत पुर्ण करण्याच्या सूचना

**ठाणे :** ठाणे शहरातील रस्त्याची सद्यस्थिती, सुरु असलेली कामे व त्यांचा दर्जा याची पाहणी करीत असताना महापालिका पालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी अधिकाऱ्यांची झाडाझडती घेतली. रस्त्याची कामे होत असताना अभियंत्यांनी त्या ठिकाणी उपस्थित राहून काम करुन घेतले पाहिजे. तसेच शहरातील रस्त्यांच्या कामाचा दर्जा हा चांगला असला पाहिजे असे नमूद करतानाच रस्त्यांची कामे कालमर्यादेत पुर्ण करण्याच्या सूचनाही बांगर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना पाहणीदौऱ्यादरम्यान दिल्या.

गुरवारी महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी शहरातील रस्त्याची पाहणी केली. यावेळी नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, उपनगरअभियंता रामदास शिंदे यांच्यासह संबंधित विभागाचे कार्यकारी अभियंता उपस्थित होते.

पाचपाखाडी येथील नितीन कंपनी ते तीन हात नाका, कोपरी बारा बंगला, ठाणे जिमखाना परिसर, सरस्वती शाळेजवळील परिसर, गोखले रोड, माजिवडा जंक्शन, सिनेवंडर सर्व्हिस रोड, शास्त्रीनगर वर्तकनगर, रुणवाल नगर आदी ठिकाणच्या कामे झालेल्या रस्त्यांची पाहणी आयुक्त बांगर यांनी केली. या पाहणी दौऱ्यात अनेक ठिकाणी रस्त्याच्या कडेला असलेल्या फूटपाथजवळील रस्त्याच्या काही भागाचे काम अर्धवट असल्याचे निदर्शनास येताच याबाबतचा खुलासा विचारत संपूर्ण रस्त्याचे काम करण्याच्या सूचना दिल्या.

कोपरी बारा बंगला परिसरातील रस्त्याच्या दुतर्फा बंगले असून या ठिकाणच्या रस्त्यावर एका सरळ रेषेत साईडपट्ट्या मारणे, ज्या ठिकाणी उताराची गरज आहे त्या ठिकाणी त्या पध्दतीत कामे करणे, पावसामुळे पाणी साचले तर रस्त्यावर खड्डे पडू शकतात हे गृहित धरुन पाण्याचा व्यवस्थित निचरा होईल अशा पध्दतीने कॉंक्रीटीकरण, मास्टिक पध्दतीचा वापर करुन रस्त्याची कालमर्यादा जास्तीत जास्त वाढेल अशा दृष्टीने कामे करुन घ्यावीत. लक्ष्मीपार्क ते रुणवालपर्यतंच्या रस्त्यावर लेनमार्किंग करावे. रस्त्यांना खड्डे पडले तर कंत्राटदारासह संबंधित सर्व अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाईल असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. रस्त्याच्या कामाच्या दर्जाबाबत समाधान नसेल तर दुरूस्तीशिवाय कोणत्याही कामांची देयके सादर होणार नाही याची खबरदारी घेण्याच्या सूचनाही यावेळी आयुक्त बांगर यांनी दिल्या

कोपरी बंगला परिसर, सिनेवंडर येथील सर्व्हिस रोड येथील मशीनहोलची झाकणे तातडीने बसवावीत. तसेच रस्त्याच्या कडेला जे डेब्रीज पडले आहेत, ते हटविण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

मेट्रोचे काम घोडबंदर येथे सुरू असुन या कामासाठी लागणाऱ्या पोकलेन मशीन या गाडीत टाकून नेण्याऐवजी रस्त्यावरुन नेल्यामुळे रस्त्याची दुरावस्था झाली आहे, रस्त्याची नुकसानभरपाई देणेबाबत संबंधित विभागाला पत्रव्यवहार करण्याबाबतही त्यांनी सांगितले.

# बुलेट ट्रेनची जमीन मोजणीसाठी गेलेल्या कर्मचाऱ्यांना मारहाणीविरोधात आंदोलन




कठोर कारवाई करण्याची निवेदनाद्वारे मागणी

**ठाणे :** भिवंडी तालुक्यातील खारबाव येथील जमिनीची फेरमोजणी करण्यासाठी गेलेल्या भूमी अभिलेख विभागाचे उप अधिक्षकासह बुलेट ट्रेन भू संपदान विभागाच्या कर्मचाऱ्यांवर गावगुंडांनी मारहाण केल्याची घटना घडली. या घटनेच्या निषेधार्थ गुरुवारी भूमी अभिलेख कर्मचारी संघटनेच्यावतीने आंदोलन करीत ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांना निवेदन देत हल्लेखोरांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी भिवंडी आणि उपाधीक्षक भूमी अभिलेख भिवंडी कार्यालयाचे निमतानदार परीक्षीत कांबळे व बुलेट ट्रेन भूसंपादन संस्थेचे प्रतिनिधी हे बुधवारी भिवंडी तालुक्यातील खारबाव सर्वे नंबर ३७९ व इतर जमिनीची फेरचौकशी मोजणी करणेसाठी प्रत्यक्ष जागेवर गेले. यावेळी तेथील काही गावगुंड जमापरीक्षीत कांबळे व बुलेट ट्रेन भूसंपादन संस्थेचे प्रतिनिधी या दोन्ही कर्मचाऱ्यांना खारबाव येथील गावांनी बंदिस्त करून त्यांना मारहाण केली. त्यामुळे या विभागातील प्रत्यक्ष क्षेत्रीय स्तरावर काम करणाऱ्या अधिकारी व कार्यालयीन कर्मचाऱ्यांमध्ये दहशत माजवून राष्ट्रीय प्रकल्प बंद पाडण्यासाठीचे प्रयत्न करीत असल्याचे दिसून येत आहे. तरी अशा गावगुंडावर फक्त गुन्हे उपयोग नाही तर त्यांना जास्तीत जास्त कठोर शासन होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यातच ठाणे जिल्ह्यामध्ये कर्मचा-यांवर वावर हल्ले करण्यामध्ये दिवसागणिक वाढ होत आहे. यापुढे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर अशा पद्धतीने दहशत पसरविण्याचे काम होवू नये, यासाठी कठोरात कठोर शिक्षा होणे गरजेचे असल्याचे संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच क्षेत्रीय स्तरावर काम करणाऱ्या कर्मचारी यांना भूसंपादन मोजणी प्रकरणे, कोर्ट कमिशन, कॉटवाटप व इतर मोनी करणांमध्ये पुरेसे पोलीस संरक्षण दिल्याशिवाय मोजणीसाठी प्रत्यक्ष जागेवर पाठविण्यात येऊ नये, अशा सक्त सूचना आपल्या स्तरावरून संबंधीत कार्यालय प्रमुख भूसंपादन संस्था यांना देण्यात याव्यात अशी मागणी देखील भूमी अभिलेख कर्मचारी संघटनेच्यावतीने करण्यात आली असल्याची माहिती संघटनेचे अध्यक्ष रमेश सरकटे यांनी दिली.

# गुजरातच्या विजयात ठाण्याचा खारीचा वाटा- आमदार संजय केळकर

### हीच घोडदौड राज्यात आणि ठाण्यात ही सुरू राहील – आमदार निरंजन डावखरे

**ठाणे:** पुन्हा एकदा भारतीय जनता पार्टीला गुजरात राखता आले. तेथील विजयानंतर गुरुवारी ठाण्यात भाजप कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. ढोल वाजून आणि त्याच्या तालावर ठेका धरत नाचत आनंद साजरा केला. यावेळी, बोलताना आमदार संजय केळकर यांनी मतदारांना मोदी आणि त्यांच्या विकासाच्या मॉडेल शिवाय काहीही बघायला तयार नाहीत. तसेच गुजरातच्या विजयात ठाण्याचा खारीचा वाटा आहे. असे आवर्जून सांगितले. तर, विजयाची ही घोडदौड अशीच राज्यात आणि ठाण्यात सुरू राहणार आहे, असा विश्वास ही आमदार निरंजन डावखरे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

एकीकडे गुजरात राखण्यात भाजपला यश आल्यावर सर्वत्र जल्लोष सुरू असताना, ठाण्यातील खोपट कार्यालयाबाहेर भाजप कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. यावेळी आमदारांसह माजी नगरसेवक, पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने आनंदोत्सव साजरा करताना दिसत होते.

# शिक्षकांकडून दलित विद्यार्थ्यांचा जातीय छळ; राष्ट्रवादी विद्यार्थी कॉंग्रेस आक्रमक

**ठाणे ;** वाल्मिकी समाजाच्या विद्यार्थ्यांचा जातीय छळ केला जात असल्याचा आरोप करीत राष्ट्रवादी विद्यार्थी कॉंग्रेसने करत गुरवारी त्याच्याविरोधात रामनगर येथील एका शाळेमध्ये आंदोलन करण्यात आले.

,वागळे इस्टेट,रोड नं २८,रामनगर येथे साधना विद्यालय नामक शाळा आहे. या शाळेत रामनगर भागातील वाल्मिकी समाजाचे अनेक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांना इतर विद्यार्थ्यांच्यासोबत न बसवता जमिनीवर बसविणे, त्यांना वारंवार शिक्षा करणे, जातीवाचक शब्दात अपमान करणे आदी प्रकार केले जात असल्याच्या तक्रारी राष्ट्रवादी विद्यार्थी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष प्रफुल्ल कांबळे यांच्याकडे काही पालकांनी केल्या होत्या. या तक्रारींची खातरजमा केली असता, या शाळेतील एक शिक्षिका जाणीवपूर्वक दलित विद्यार्थ्यांना त्रास देत असून पालकांना भेटायला बोलावून तुमच्या जातीची मुले शिक्षण घेतातच कशाला? त्यांना इतर मुलांप्रमाणे उनाडक्या करु देत; त्यांची शिक्षण घेण्याची लायकी नाही, अशा पद्धतीची विधाने केल्याचे पालकांनी सांगितले. त्यानंतर कांबळे यांनी शाळा प्रशासनाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, शाळा प्रशासनाने त्यांना भेटही नाकारली. त्यामुळे या शिक्षिकेवर कारवाई करावी; त्या शिक्षिकेवर अट्रोसिटी ॲक्ट नुसार गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी मा. गृहनिर्माण मंत्री डॉ जितेंद्र आव्हाड यांच्या आदेशावरून आणि शहराध्यक्ष आनंद परांजपे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी विद्यार्थी कॉंग्रेसचे अध्यक्ष कांबळे यांच्या नेतृत्वाखाली व महिलाध्यक्ष सुजाता घाग यांच्या उपस्थितीत शाळेच्या प्रवेशद्वाराजवळच आंदोलन केले. यावेळी आंदोलकांनी शाळा प्रशासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करीत संबधित शिक्षिकांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. या आंदोलनात रमेश दोडके, समीर नेटके, फिरोज पठाण, विक्रांत घाग, अनिता मोटे, कांता गजमल, फुलबानो पटेल, यांच्यासह अनेक विद्यार्थी, पालक सहभागी झाले होते.



# विकसित-अविकसित ठाणे जिल्ह्यातील फरक दूर करावा

## - केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील

***ठाणे : केंद्र सरकारच्या माध्यमातून विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी प्राप्त होतो. ठाणे जिल्हा हा पूर्ण विकसित जिल्हा नाही. दिशा समितीच्या माध्यमातून ठाणे जिल्ह्याच्या विकसित व अविकसित भागातील फरक दूर करण्याचा प्रयत्न अधिकाऱ्यांनी करावा, असे आवाहन केंद्रीय पंचायती राज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी सोमवारी केले.***




ठाणे जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समितीची (दिशा) बैठक सोमवारी ठाणे जिल्हा नियोजन भवनात केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली.या वेळी जिल्हा परिषद अध्यक्ष पुष्पा पाटील, आमदार गणपत गायकवाड, निरंजन डावखरे, प्रमोद पाटील, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष सुभाष पवार, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनुज जिंदल, नवी मुंबई महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर, कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ. भाऊसाहेब दांगडे, मीरा-भाईंदर महानगरपालिका आयुक्त दिलीप ढोले, उल्हासनगर महापालिका आयुक्त अजीज शेख, भिवंडी महापालिकेचे आयुक्त विजयकुमार म्हैसाळ, ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते, जिल्हा प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे आदी उपस्थित होते.

दिशा समितीच्या माध्यमातून केंद्र सरकारकडून जिल्ह्यात कोट्यवधी रुपये निधी येतो. मुंबईजवळ असलेला ठाणे जिल्हा हा विकसित असल्याचा समज आहे. मात्र, जिल्ह्याचा मोठा भाग अविकसित आहे. केंद्र सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी केल्यास विकसित-अविकसित जिल्ह्यातील फरक दूर करता येईल, असे मत केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी व्यक्त केले.

केंद्र सरकारच्या विविध योजनांची अंमलबजावणी संथ गतीने सुरू आहे. सध्या दिशा समितीची बैठक दरमहा तीन महिन्याने होते. त्याऐवजी जिल्हाधिकारी स्तरावर महिन्यात बैठक घेतल्यास कामांना वेग येईल, अशी सुचना कपिल पाटील यांनी केली.

केंद्र सरकारच्या गतीमान कारभाराबरोबरच आता राज्याचा कारभारही वेगाने सुरू आहे. बुलेट ट्रेन, वडोदरा महामार्गाच्या भूसंपादनासंदर्भातील कामाची लवकरात लवकर पूर्तता करावी, अशी सुचना केंद्रीय राज्यमंत्री पाटील यांनी केली.

प्रधानमंत्री आवास योजनेतून घरे देण्यासाठी २०२२ पर्यंत मुदत निश्चित करण्यात आली होती. मात्र, जिल्ह्यातील घरांचे लक्ष्य पूर्ण झालेले नाही. त्यामुळे या योजनेतील अडचणी दूर करून घरे बांधण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी सुचना पाटील यांनी केली.

## डॉ. प्रज्ञा दया पवार यांना गंगाधर गाडगीळ साहित्य पुरस्कार जाहीर

**ठाणे :** प्रख्यात कवयित्री प्रा. डॉ. प्रज्ञा दया पवार यांना यंदाचा गंगाधर गाडगीळ साहित्य पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. येत्या शुक्रवारी हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात येणार आहे.

ठाणे येथे वास्तव्यास असणार्या डॉ. प्रज्ञा दया पवार या ज्ञानसाधना महाविद्यालयामध्ये मराठी विषयाच्या विभागप्रमुख आहेत. काव्य, ललित लेखन, नाट्य, कथा आदी सर्वच साहित्य प्रकारात त्यांनी मुशाफिरी आहे. त्यांचे उत्कट जीवघेण्या धगीवर, अंतःस्थ हा काव्यसंग्रह, दृश्यांचा ढोबळ समुद्र, मी भिडवू पहातेय समग्राशी डोळा हे काव्यसंग्रह; अर्वाचीन आरण (संमिश्र गद्यलेख); आरपार लयीत प्राणांतिक (दीर्घकविता); केंद्र आणि



परीघ, टेहलटिकोरी (संग्रहित ललित); धादांत खैरलांजी (नाटक); मी भयंकराच्या दरवाज्यात उभा आहे ( नामदेव ढसाळ यांची निवडक कवितांचे सहसंपादन) विमुक्तांचे स्वातंत्र्य (सहसंपादन, २०१८, परिवर्तनाचा वाटसरू प्रकाशन, ठाणे) आणि अफवा खरी ठरावी म्हणून (कथासंग्रह) प्रकाशित झाले आहेत. विशेष म्हणजे, अफवा खरी ठरावी हा कथासंग्रह इंग्रजी आणि कन्नड भाषेतही अनुवादीत झाला आहे. प्रज्ञा पवार यांना यापूर्वी मानाचे १४ पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत.

येत्या शुक्रवारी ९ डिसेंबर रोजी ठाण्यातील मराठी ग्रंथ संग्रहालय येथे सायंकाळी सहा वाजता होणार्या कार्यक्रमात अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष भारत सासणे आणि ज्येष्ठ समीक्षक मिना गोखले यांच्या हस्ते डॉ. प्रज्ञा पवार यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

## ठाणे हिरवेगार करणार 'मियावाकी जंगल'

**ठाणे :** ठाणे शहरातील वाढत्या शहरीकरणाबरोबरच पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन राखण्यासाठी कमी जागेत जास्त वनस्पतीची लागवड करता येणारे ठाण्यातील पहिले मियावाकी जंगल शहरातील विविध ठिकाणी उभारण्यात येणार आहे. पर्यावरणपूरक काम करणाऱ्या ग्रीन यात्रा या संस्थेच्या माध्यमातून हे काम करण्यात येणार असून प्राथमिक स्वरुपात ३ हजार चौ. मी जागेत मियावाकी जंगल उभारण्यात येणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिली.

महापालिकेतर्फे हाती घेण्यात आलेल्या स्वच्छता व सौंदर्यीकरणाच्या अभियानासोबतच शहरामध्ये हरित पट्टे निर्माण करण्याचा उपक्रम हाती घेतला जात आहे. कौपरखैरणे येथे निसर्ग उद्यान, ज्वेल ऑफ नवीमुंबई ठिकाणी अशा प्रकारची शहरी जंगले उभारण्यात आली असून निश्चितच त्याचा पर्यावरणाला लाभ होत आहे. याच धर्तीवर ठाणे शहरात अशा प्रकारचे जंगल उभारण्यासाठी ग्रीन यात्रा या संस्थेबरोबर मंगळवारी (६ डिसेंबर) रोजी आयुक्त बांगर यांच्यासमवेत बैठक पार पडली. या बैठकीस उद्यान विभागाचे अधिकारी, तसेच ग्रीन यात्रा संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

वाढत्या शहरीकरणामुळे शहरातंर्गत झाडांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. यावर पर्याय म्हणून कमी जागेत जास्तीत जास्त वनीकरण करता यावे यासाठी मियावाकी जंगल उभारण्यात येणार आहे असून यामुळे निश्चितच वाढत्या शहरीकरणाबरोबर पर्यावरणाचाही समतोल राखला जाईल अशी माहिती बांगर यांनी दिली. अशा प्रकारचे जंगल उभारण्यासाठी एकूण आठ ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. यामध्ये निसर्गउद्यान मुल्लाबाग येथे ८ हजार चौ.मी., मोगरपाडा दुभाजक येथे ५ हजार चौ.मी., मोघरपाडा येथील आरक्षित मोकळा भूखंड ए येथे ७३०० चौ.मी., प्लॉट बी येथे १५०० चौ.मी., कोपरी येथे ४७०० चौ.मी. नागला बंदर येथे १ हजार चौ.मी., तर पारसिक विसर्जन घाटाजवळ ३ हजार चौ.मी अशी एकूण ७.६ एकर जागा निवडण्यात आली आहे. सीएसआर निधीच्या माध्यमातून मियावाकी जंगल उभारत येणार असून यासाठी महापालिकेवर कोणताही आर्थिक बोजा पडणार नाही. तसेच झाडांची लागवड व तीन वर्षे देखभाल दुरूस्तीचा खर्च सदर संस्था करेल. तसेच या माध्यमातून निर्माण होणाऱ्या कार्बनक्रेडीटवरही महानगरपालिकेचा अधिकार राहणार असल्याचे आयुक्तांनी नमूद केले.



# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे १६ डिसेंबरला रत्नागिरीत

## ५०० कोटीहून अधिक रुपयांच्या विकास कामांचा होणार शुभारंभ

***रत्नागिरी : राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शुक्रवार १६ डिसेंबर रोजी रत्नागिरी दौर्‍यावर येत आहेत. यावेळी बहुचर्चित तारांगणाचे उद्घाटनही मुख्यमंत्री शिंदे यांच्याहस्ते करण्यात येणार आहे. रत्नागिरीच्या इतिहासातील अभूतपूर्व अशी सभा होणार असल्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.***

ते म्हणाले की, रत्नागिरी मतदार संघात तब्बल ५०० कोटीहून अधिक रुपयांच्या विकास कामांचे भूमिपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. तसेच रत्नागिरी-सिंधुदुर्गच्या विकासाबाबत ते अधिकार्‍यांची सकाळी हॉटेल विवेकच्या हॉलमध्ये आढावा बैठक घेऊन त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. त्यानंतर ५वी ते १०वीच्या मुलांच्या हस्ते तारांगणाचे उद्घाटन होणार असून, यावेळी मुख्यमंत्री उपस्थित राहणार आहेत.

दरम्यान रत्नागिरीतील इंजिनिअरींग कॉलेजच्या इमारतीचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते होणार आहे. या दौर्‍यात रत्नागिरी मतदार संघातील तब्बल पाचशे कोटीहून अधिक कामांचा शुभारंभ एका क्लिकवर मुख्यमंत्री करणार आहेत. यामध्ये १३७ कोटीची मिर्या हातखंबा नळपाणी योजना, १०६ कोटीचे शहरातील काँक्रीटच्या रस्त्यांचे भूमिपूजन, १०० कोटीहून अधिकच्या किंमतीचे पोलीस अधीक्षक कार्यालय व पोलीस कर्मचारी वसाहत, ९३ कोटी रुपयांचे नाणीज येथील धरण, ३२ कोटींचे जयगड प्रादेशिक नळपाणी योजनेसाठीचे कळझोंडी येथील धरणाच्या कामाचा शुभारंभ होणार असल्याचे ना. सामंत यांनी स्पष्ट केले. लांजा व राजापूर तालुक्यातील काही विकास कामांचा शुभारंभही यावेळी होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. रत्नागिरी विमानतळाच्या भूमीअधीग्रहणासाठी ७७ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. यासाठी जमीन मालकांना गुंठ्याला ४७ हजार रुपये दर निश्चित करण्यात आला असून त्याच्या चौपट अशी १ लाख ८८ हजार रुपये भाव दिला जाणार आहे. टर्मिनल इमारतीचे काम पुढील महिनाभरात सुरु होणार असल्याचे पालकमंत्री ना. उदय सामंत यांनी सांगितले.

## हापूसच्या परदेश निर्यातीसाठी जिल्ह्यातील आंबा बागायतदार सरसावले

**रत्नागिरी –** परदेशात निर्यात होणाऱ्या आंब्याला चांगला दर मिळत असल्याने हापूसच्या परदेश निर्यातीसाठी जिल्ह्यातील आंबा बागायतदार सरसावले आहेत.

परदेशात निर्यातीसाठी शासनाच्या मँगोनेट योजनेचा लाभ घेताना शेतकरी दिसत आहेत. मँगोनेटमध्ये गतवर्षी २०२१ पर्यंत जिल्ह्यातील ४ हजार ५६६ आंबा उत्पादकानी नोंदणी केली होती. तर ३ हजार ३९९ आंबा उत्पादकानी प्रमाणपत्राचे नूतनीकरण केले होते. २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी ३१ मार्च २०२३ पर्यंत नोंदणी करावयाची असून आतापर्यंत डिसेंबर पर्यंत ४० बागायतदारांनी नोंदणी केली आहे.

२०१३ मध्ये युरोपमध्ये निर्यात होणारी ताजी फळे व भाजीपाला यांच्यात किडींचा पादुर्भाव आढळला होता. त्याचा परिणाम आंबा निर्यातीवर बंदी घालण्यात आली होती. युरोपियन देशात घातलेल्या बंदीने आंबा बागायतदार चिंतेत होता. भविष्यात पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी मँगोनेटचा महत्वपूर्ण निर्णय २०१३ मध्ये घेण्यात आला. त्यामुळे उत्पादकांसाठी आंबा निर्यातीसाठी नवे माध्यम उपलब्ध झाले. उत्पादकांना मँगोनेटद्वारे आंबा निर्यातीचे द्वार खुले झाले आहे.

## थर्टी फर्स्टच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात पर्यटकांचा ओघ वाढला

### निवासस्थानांचे आरक्षण ७५ ते ८० टक्के फुल्ल

**रत्नागिरी –** २०२२ च्या सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी आणि पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी अनेक पर्यटक आणि मुलांच्या सहलीच्या गाड्यांची गर्दी जिल्ह्यात वाढत आहे. परिणामी यामुळे पर्यटनाला चालना मिळत आहे. वाढत्या पर्यटकांमुळे पर्यटन विकास महामंडळाच्या निवासस्थानांना पसंती दिसून येत आहे. पर्यटकांमुळे रत्नागिरी जिल्ह्यातील निवासस्थानांचे आरक्षण ७५ ते ८० टक्के झाले आहे. गेल्या वर्षभरात पर्यटनाला चांगला प्रतिसाद मिळू लागला आहे.

पश्चिम महाराष्ट्रासह मराठवाडा, विदर्भातून दिवसाला पाचहून अधिक सहलींच्या गाड्या दाखल होत आहेत. रत्नागिरी हे पर्यटन स्थळ असल्यामुळे तालुक्यातील गणपतीपुळे, थिबा पॅलेस, लो. टिळक स्मारक, जिजामाता उद्यान, भगवती बंदर अशा अनेक ठिकाणी गर्दी दिसून येत आहे. गणपतीपुळे, मांडवी समुद्र किनाऱ्यावरही प्रचंड गर्दी होत आहे. आणखी काही दिवसांनी हॉटेल्स, मॉल्स मोठ्या प्रमाणात फुल्ल होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

## जिल्हास्तरीय शालेय तायक्कांडो स्पर्धेत तायक्कांडो स्पोर्ट्स फाऊंडेशन दापोलीचे यश

**दापोली:–** नुकत्याच डेरवण क्रिडा संकुल येथे संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेत तायकांडो स्पोर्ट्स फाऊंडेशन दापोलीच्या खेळाडूंनी बाजी मारली आहे.यामध्ये ए.जी. हायस्कूलच्या शाल्मली माने तसेच संतोष भाई मेहता स्कूलच्या वेदांत इदाते याने सुवर्ण पदक जिंकले आहे.तर ऋतुराज इदाते याने रौप्य पदक पटकावले आहे. सरस्वती स्कूलच्या स्वराली दळवी हिने कांस्य पदक मिळवले तर मृणाली तांबे हिने स्पर्धेमध्ये सहभाग घेतला होता. या संपूर्ण स्पर्धेमध्ये सुवर्ण पदक विजेत्या खेळाडूंची विभागीय स्पर्धेत निवड झाली आहे.

या खेळाडूंनी तायकाँदो स्पोर्ट्स फाऊंडेशन दापोली संस्थेचे नाव उज्वल केले आहे. या खेळाडूंना प्रमुख प्रशिक्षक कु.प्राजक्ता माने व सहप्रशिक्षक सौ.शिल्पा साखळकर मॅडम ह्यांनी मार्गदर्शन केले. या संपूर्ण स्पर्धेचे आयोजन क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य,पुणे अंतर्गत रत्नागिरी जिल्हा क्रीडा कार्यालय,रत्नागिरी आयोजित रत्नागिरी जिल्हा शालेय तायकाँदो स्पर्धा यांच्या मार्फत करण्यात आले होते. यश प्राप्त केलेल्या खेळाडूंना तायकाँदो स्पोर्ट्स अकादमी दापोली सर्व पदाधिकाऱ्यांनी कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## रत्नागिरीच्या मुला-मुली संघाची खो-खो स्पर्धेच्या बाद फेरीत धडक

**रत्नागिरी :** महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने रायगड जिल्हा खो-खो असोसिएशन आयोजित ४८ वी कुमार - मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेत मुलींमध्ये पुणे, ठाणे, सांगली यांनी तर कुमार गटात उस्मानाबाद, पुणे ठाणे, मुंबई उपनगर, सांगली यांनी बाद फेरीत प्रवेश केला.

धाटाव (ता. रोहा) येथील कै. नथुराम (भाऊ) पाटील क्रीडानगरीत, परमपुज्य पांडुरंगशास्त्री आठवले विद्यालय आणि एम. बी. मोरे फाऊंडेशन महाविद्यालयाच्या क्रिडांगणावर सुरु असलेल्या सामन्यात मुली गटात रत्नागिरी संघाने साताऱ्यावर एक डाव २ गुणांनी (२४-१३) मात केली. विजयी संघातर्फे पायल पवार (३.३० मी, २ मी. संरक्षण व २ गुण), श्रेया सनगरे (२.५० मी, ३ मी. संरक्षण व २ गुण ), आर्या डोर्लेकर (२ गुण ) यांनी तर सातारा तर्फे गीतांजली जाधव (१.४० मी. संरक्षण ) यांनी चांगला खेळ केला. दुसऱ्या सामन्यात पुणेने धुळे चा २१ गुणांनी (२८-७) पराभव केला. पुणेतर्फे मानसी हरगणे (२.३० मी. संरक्षण ), प्रेरणा कांबळे (३.३० मी. संरक्षण ), दिपाली राठोड (४ गुण ) असा खेळ केला. तर धुळे तर्फे हंसिका पाटील (१.४० मी., १.३० मी संरक्षण व २ गुण ) हिने एकतर्फी लढत दिली. तिसऱ्या सामन्यात ठाणे संघाने जालना चा २० गुणांनी (२३-३) असा पराभव केला. ठाणे तर्फे प्रीती हलगरे (२.३० मी. संरक्षण ), सान्वी तळवडेकर (२.३० मी. संरक्षण, १ गुण ), कल्याणी कंक (७ गुण ) असा खेळ केला. पराभूत जालना संघातर्फे श्रद्धा चांदने (१ मी. संरक्षण ) चांगला खेळ केला. उर्वरित काही सामन्यात अहमदनगर ने औरंगाबादचा २ मी. आणि ७.२० गुण राखून तर सांगली ने मुंबई उपनगरचा १ डाव ११ गुण राखून (१५-४) असा पराभव केला.

कुमार गटातील सामन्यात उस्मानाबाद संघाने धुळे संघावर एक डाव ४ गुण राखून मात केली. विजय संघातर्फे भरतसिंग वसावे (२.१० मी. संरक्षण, ३ गुण ), सचिन पवार (२ मी. संरक्षण, २ गुण ) यांनी तर धुळे संघातर्फे जयेश फुलपागरे (०.४० से. संरक्षण, १ गुण ) यांनी चांगला खेळ केला. दुसऱ्या सामन्यात ठाणे संघाने परभणी चा १ डाव ३ गुणांनी (१२-९) असा पराभव केला. त्यात राज संकपाळ (३.३० मी. संरक्षण, १ गुण ), सुरज मोरे (३.२० मी., संरक्षण ) असा खेळ करत विजय मिळवला. धुळे तर्फे नितीन खाटिंग (१.४० मी., संरक्षण व १ गुण ) ने चांगला खेळ केला. तिसऱ्या सामन्यात पुणे ने मुंबई चा १ गुण आणि ६.३० मिनिटे (१७-१६) राखून पराभूत केले. पुणेकडून विवेक ब्राहमाने (२.२० मी., १.४० मी. संरक्षण व ३ गुण ), आकाश गायकवाड (१ मी., १ मी., व ५ गुण ) खेळ करत विजयात मोलाची कामगिरी केली. पराभूत मुंबई तर्फे जनार्दन सावंत (१.२० मिनीटे व ३ गुण ), रोहित केदारे ( १ मी., १ मी., व ४ गुण ) यांनी चांगली लढत दिली.



## औरंगाबाद येथे ठाण्याच्या दोन कन्यांची सुवर्ण कामगिरी

**ठाणे:** औरंगाबाद येथे ४ ते ६ डिसेंबर रोजी पार पडलेल्या महाराष्ट्र आंतरविद्यापीठ खेळ स्पर्धेत ठाण्याच्या निधी सिंग आणि सानिका नाटे या दोघींनी सुवर्ण कामगिरी केली आहे.

ठाण्याच्या दादोजी कोंडदेव स्टेडियम येथे सराव करणारी निधी सिंग हिने ४०० मीटरमध्ये नवीन वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी करत सुवर्णपदक मिळवले. तसेच निधीने २ दिवसांत २ वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी केली निधीने ४ x १०० मीटर रिलेमध्ये सुवर्णपदक आणि ४ x ४०० मीटर रिलेमध्ये कांस्यपदक मिळवले. या स्पर्धेत २ सुवर्ण आणि १ कांस्य पदक मिळवणारी निधी सिंग ही एकमेव खेळाडू आहे. सानिका नाटे हीने ४ x १०० मीटर रिलेमध्ये सुवर्णपदक मिळवले. सानिकाची १०० मीटर्समध्ये पोडियम फिनिशिंग चुकली.

> ***ही माझ्यासाठी खरोखरच चांगली स्पर्धा होती. मी माझ्या मागील वैयक्तिक सर्वोत्तमपेक्षा दोनदा खाली धावली. आगामी स्पर्धेसाठी अधिक मेहनत घेईन.*** – निधी सिंग

> ***माझ्यासाठी हे खूप चांगले शिक्षण आहे. पुढच्या वेळी अजून चांगली कामगिरी करेल.*** – सानिका नाटे

> ***निधी सिंग खूप चांगले प्रशिक्षण घेत आहे. माझ्या अपेक्षेनुसार तिने खूप चांगली कामगिरी केली. वैयक्तिक सर्वोत्तम करणे ही यशाची गुरुकिल्ली आहे हे पुन्हा सिद्ध झाले. या स्पर्धेतून सानिकाला खूप काही शिकायला मिळाले.*** – निलेश पाटकर, प्रशिक्षक.

# मोखाड्यातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी जलसंधारणाच्या कामात ठाण्यातील ट्रस्टचा हातभार




**ठाणे:** मोखाडा तालुक्यातील भीषण पाणीटंचाई दूर करण्यासाठी अतिदुर्गम गावपाड्यांची तहान भागवण्यासाठी स्थळानुरूप जलसंधारणाचे काम ठाण्याच्या ब्लॉसम चॅरिटेबल ट्रस्ट या सेवाभावी संस्थेने

हाती घेतलेले आहे. या संस्थेने मोखाडा तालुक्यातील कायम पाणीटंचाई असलेल्या अतिदुर्गम अशा ७ गावांमध्ये पाणीपुरवठ्यासाठी कायमस्वरूपी वैविध्यपूर्ण उपाययोजना करून येथील पाणीटंचाई दूर केली आहे.

ही संस्था २०१९ सालापासून पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यात पाणीटंचाई निवारणासाठी कार्यरत आहे. मागील तीन वर्षांत या संस्थेच्या माध्यमातून जलसंधारण विषयातील तज्ञ डॉ. उमेश मुंडल्ये यांच्या मार्गदर्शनाखाली मोखाडा तालुक्यातील खोडाळा परिसरातील बादलपाडा, जोगलवाडी, राजेवाडी, सप्रेवाडी, दूधगाव, पोऱ्याचा पाडा व डोंगरवाडी अशा कायम दुर्भिक्ष्य असलेल्या ७ गावांत पाणी साठवण्यासाठी बंधारे, विहीरी यांसारख्या उपाययोजना यशस्वीरित्या राबवल्या. या योजनांमुळे गावात वर्षभर पाणी उपलब्ध होत आहे. रात्री-अपरात्री करावी लागणारी पायपीट थांबल्यामुळे विशेषत: आबालवृद्ध आणि महिलांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत आहे. या लोकोपयोगी उपक्रमामुळे ३ हजार लोकांचा पाण्याचा प्रश्न कायमचा सुटला आहे.

चालू आर्थिक वर्षीदेखील ब्लॉसम ट्रस्टने रोटरी क्लब ऑफ ठाणे वेस्ट व रोटरी क्लब मेंपल ग्रोव (अमेरिका) च्या सौजन्याने बेडूकपाडा, सावरपाडा, बोरशेती या तीन गावांचे ग्लोबल ग्रँटच्या मार्फत पाणी संवर्धनाचे काम हाती घेतले असून नुकत्याच झालेल्या या योजनेच्या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी बादलपाडा येथे ब्लॉसम चॅरिटेबल ट्रस्ट संस्थेचे चेअरमन ॲड. अश्विनी रणदिवे, शर्मिला गुप्ते व डॉ. मुंडल्ये यांच्यासह रोटरीचे पदाधिकारी उपस्थित होते.

ब्लॉसम ट्रस्टने कोविड-१९ च्या काळात देखील या भागातील अनेक गावांत अन्नधान्याचे वाटप केले. मोखाडा तालुक्यातील मौजे साखरी येथील कोविड सेंटरला संकल्पन या कंपनीच्या सौजन्याने २४ जम्बो ऑक्सिजन सिलिंडर व बेडशीट आणि ब्लॅंकेट उपलब्ध करून दिले आहेत.

# देशाच्या सैनिकांच्या कुटूंबाप्रती कृतज्ञता असली पाहिजे

## – जिल्हाधिकारी अशोक शिनगारे



**ठाणे :** सैन्यदलातील शौर्य, देशासाठी बलिदान देण्याची सैनिकांची तयारी, त्यांची यशोगाथा आपल्याला प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे स्पर्श करून जाते. त्यांच्याप्रती कृतज्ञता असली पाहिजे, ही भावना वाढीला लागली पाहिजे. त्यांच्या कुटूंबाप्रती असलेली जबाबदारी पूर्णत्वात पार पाडली पाहिजे, अशी भावना ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी गुरुवारी व्यक्त केली.

ठाणे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातर्फे 'सशस्त्र सेना ध्वजदिन निधी २०२२ संकलन शुभारंभ' कार्यक्रमात शिनगारे बोलत होते. यावेळी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी २०२१ संकलनात उत्कृष्ट काम करणाऱ्यांचे कौतुक केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी सुदाम परदेशी, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी निवृत्त मेजर प्रांजल जाधव, उपविभागीय अधिकारी अविनाश शिंदे, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) गोपीनाथ ठोंबरे, आदी यावेळी उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या सुरूवातीला शूरविरांना श्रद्धांजली वाहण्यात आली. उपस्थित मान्यवरांना ध्वज लावून ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ करण्यात आला. सशस्त्र सेना ध्वजदिन -२०२१ निधी संकलनाचे उत्कृष्ट कार्य केलेल्या संस्था, कार्यालये यांचा प्रशस्तिपत्र, सनद व भेटवस्तू देऊन जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तहसीलदार युवराज बांगर, नायब तहसीलदार दिनेश पैठणकर यांच्यासह विविध विभागाच्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना गौरविण्यात आले.

# लाचेची मागणी करणाऱ्या पोलीस हवालदारावर गुन्हा दाखल

ठाणे: तुमच्यावर ४२० प्रमाणे गुन्हा दाखल करतो, असे धमकावून गुन्हा दाखल न करण्यासाठी २५ हजारांच्या लाचेची मागणी करणारे नौपाडा पोलीस ठाण्याचे हवालदार दिलीप माळवे यांच्याविरोधात नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. हा गुन्हा त्यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावर दाखल केला असून पुढील तपास ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी) करत आहे.

तक्रारदार यांचे विरोधात नौपाडा पोलीस ठाण्यात तक्रारी अर्ज प्राप्त झाला होता. त्यामधील अर्जदार यांना दुकान भाड्याने देत असल्याचे तक्रारदारांनी खोटे सांगून त्यांच्याकडून ३ लाख ७५ हजार रुपये घेतल्याची तक्रार दिली होती. त्या तक्रारी अर्जाची चौकशी नौपाडा पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार दिलीप माळवे यांच्याकडे होती. त्याअनुषंगाने चौकशी दरम्यान माळवे यांनी तक्रारदार यांना तुमच्यावर ४२० प्रमाणे गुन्हा दाखल करतो, असे धमकावून गुन्हा दाखल न करण्यासाठी २५ हजारांची मागणी केली. दरम्यान तक्रारदारांनी ठाणे एसीबीकडे धाव घेत तेथे तक्रार केली. त्या अनुषंगाने २३ नोव्हेंबर २०२२ रोजी पडताळणी केली असता, पोलीस हवालदार माळवे यांनी तक्रारदार यांच्याकडे २५ हजारांच्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्याच्याआधारे पोलीस हवालदार माळवे यांच्याविरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे (संशोधन २०१८) कलम ७ प्रमाणे नौपाड्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती एसीबी विभागाने दिली.

# नराधम सावत्र पित्यास २० वर्षे सश्रम कारावास

**ठाणे:** सावत्र अकरा वर्षीय मुलीवर अत्याचार करत तिच्या आईसह तिला आणि मोठ्या भावाला जीवे ठार मारण्याची धमकी देणाऱ्या सावत्र पित्यास ठाणे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाच्या (विशेष) न्यायाधीश व्ही. व्ही.वीरकर यांनी बुधवारी दोषी ठरवत आरोपी पित्याला २० वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. ही घटना २०१८ साली मुंब्रा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली होती. तर सरकारी वकील म्हणून रेखा हिवराळे यांनी काम पाहिले.

पीडित मुलीच्या आई वडिलांमध्ये भांडण होत असल्याने ते २००८ रोजी वडीलांपासून वेगळे राहत होते. काही वर्षांनी म्हणजे २०१३ मध्ये तिच्या आईने पेंटिंगचे काम करणाऱ्या आरोपीसोबत दुसरे लग्न केले. पीडित मुलगी आणि तिचा मोठा भाऊ तसेच आई त्या आरोपीसोबत राहत होते. सरकारी वकील म्हणून रेखा हिवराळे यांनी सादर केले पुरावे आणि साक्षीदारांची साक्ष ग्राह्य मानून आरोपीला दोषी ठरवले. त्याला २० वर्षे सश्रम कारावास आणि २२ हजार दंड अशी शिक्षा सुनावली.

# दोन अब्जाहूनही अधिक रकमेचे लेखापरीक्षण प्रलंबित असताना, ठामपाला कोट्यवधींचे अनुदान देणे हा, आर्थिक गैरव्यवहाराला पाठींबा!

## ‘धर्मराज्य पक्षा’चा ठाणे महापालिका प्रशासनावर घणाघाती आरोप

**ठाणे :** सद्यस्थितीत ठाणे महानगरपालिकेच्या तिजोरीत असलेला आर्थिक शुकशुकाट पाहता आणि ठामपाचे नवनियुक्त आयुक्त तथा प्रशासक अभिजित बांगर यांनी, पदभार स्वीकारताच, ठाणे महापालिकेची आर्थिक स्थिती बेताची असल्याचे वक्तव्य केलेले असतानाच, ठाणे महानगरपालिकेला नव्याने तब्बल सहाशे पाच कोटी रुपयांचे मिळालेले अनुदान हे, निव्वळ महापालिकेच्या पूर्वाश्रमीच्या आर्थिक गैरव्यवहाराकडे डोळेझाक करण्यासारखे असल्याचा थेट घणाघाती आरोप ‘धर्मराज्य पक्षा’च्या वतीने करण्यात आला आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, शनिवारी ठाणे महापालिका मुख्यालयाला भेट दिली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी, महानगरपालिकेला सुमारे ६०५ कोटी रुपयांचे अतिरिक्त अनुदान जाहीर केले. मुख्यमंत्र्यांनी ठामपाला दिलेले हे कोट्यवधी रुपयांचे दान म्हणजे, ठाणे महापालिकेच्या आधीच्या सर्व आर्थिक गैरव्यवहाराला पाठीशी घालण्यासारखे असल्याचा थेट आरोप ‘धर्मराज्य पक्षा’चे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी,केला आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या वेबसाईटवर वर्ष २०१७-१८ पर्यंतचे लेखापरीक्षण, महापालिकेचे मुख्य लेखापरीक्षक किरण तावडे यांच्या स्वाक्षरीने उपलब्ध असले तरी, त्यानंतर वर्ष २०१८-१९ ते वर्ष २०२१-२२ पर्यंतचे या चार वर्षांतील लेखापरीक्षण, प्रशासनाकडून अद्याप उपलब्ध झालेले नाही. येत्या सहा महिन्यांत ठाणे शहर हे, खड्डेमुक्त करण्यासोबतच ते, स्वच्छ आणि निरोगी ठेवण्याचा मनसुबा मुख्यमंत्र्यांनी ठेवला असला तरी, त्याआधी त्यांनी ठामपाच्या तिजोरीकडे आधी लक्ष देणे गरजेचे असून, वर्ष २०१७-१८च्या लेखापरीक्षणात वसुलीची शिल्लक रक्कम ही, तब्बल २,१०,००,६०,१२१ रुपये इतकी प्रचंड असताना, ती वसूल करण्याऐवजी, ठाणे महापालिकेला नव्याने कोट्यवधी रुपयांचे अनुदान देणे म्हणजे, ठाणेकर कष्टकरी-करदात्या नागरिकांच्या डोळ्यात धूळफेक तर आहेच; मात्र, त्याचबरोबर महापालिकेच्या भ्रष्ट कारभाराकडे सरळसरळ डोळेझाक असल्याचा घणाघाती आरोपही देशपांडे यांनी, केला आहे.

दरम्यान, ठाणे महानगरपालिकेचा एकूणच ढिसाळ कारभार पाहता, गेल्या चार वर्षांतील प्रशासनाची प्रगती समाधानकारक नसल्याचेच यावरुन सिद्ध होत असल्याचे, देशपांडे यांनी, स्पष्ट करीत, वर्ष २०१७-१८च्या लेखापरीक्षणातील वसुलीच्या प्रलंबित रकमेसंदर्भात, ७,२०० आक्षेपदेखील अद्यापपर्यंत प्रलंबित असल्याचे सांगितले. मध्यंतरीच्या काळात ठाणे शहरात विकासकामांच्या नावाखाली झालेला आर्थिक गैरव्यवहार, छायाचित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून उघड झालेला असताना आणि त्यासंदर्भातील माहितीच्या अधिकारातून प्राप्त झालेले सर्व पुरावे, तक्रारींच्या माध्यमातून महापालिका, पोलीस प्रशासन आणि महाराष्ट्र शासनाला सादर करुनही, प्रशासकीय पातळीवर त्याबाबत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसल्याने, तू मारल्यासारखे कर, मी रडल्यासारखे करतो अशीच नीती, खालपासून ते वरपर्यंतच्या सर्वच प्रशासकीय पातळ्यांवर अवलंबिली जात असल्याचे यानिमित्ताने उघड होत असल्याचे देशपांडे यांनी आपल्या प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे. शहरातील विकासकामे ही, करदात्या नागरिकांच्या पैशातून होत असतात; मात्र, त्या पैशांचा उघडपणे गैरवापर करीत, निव्वळ स्वतःची घरे भरली जात असून, गेल्या चार वर्षांतील २,१०,००,६०,१२१ रुपये ही, दोन अब्जाहून अधिकची रक्कम, आजतागायत अधिकृतपणे जाहीर न होणे म्हणजे, ठाणे महापालिकेतील हा गेल्या चाळीस वर्षांतील महाघोटाळा असल्याचे म्हटल्यास वावगे ठरु नये, असेही देशपांडे यांनी, ठामपा प्रशासनावर थेट आरोप करताना स्पष्ट केले आहे. या प्रलंबित लेखापरीक्षण अहवालाची कोणतीही माहिती, महापालिका प्रशासनाने आपल्या अधिकृत वेबसाईटवर जाहीर केलेली नाही, शिवाय गेल्यावेळी शासनाकडून मिळालेल्या १८०० कोटी रुपयांच्या निधीची माहितीदेखील ठामपा प्रशासनाने, आपल्या वेबसाईटवर जाहीर केलेली नसल्याने, यातूनच हा आर्थिक घोटाळा जाणूनबुजून लपवला जात असला आणि तो उघड न करताच, नव्याने कोट्यवधी रुपयांचे अनुदान मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी जाहीर करणे, हे ठामपाच्या आर्थिक गैरव्यवहाराला उघडपणे पाठीशी घालण्यासारखे असून, आधी २०१८-१९ ते वर्ष २०२१-२२ पर्यंतचे लेखापरीक्षण जाहीर करावे आणि नंतरच नवीन अनुदान देण्यात यावे, अशी आग्रही भूमिका ‘धर्मराज्य पक्षा’चे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी, प्रसिद्धीपत्रकात शेवटी म्हटले आहे.

# ज्येष्ठ क्रीडा पत्रकार व साहित्यिक आदिनाथ हरवंदे यांचे निधन

**ठाणे :** सिद्धहस्त लेखक, व्यासंगी आणि ज्येष्ठ क्रीडा पत्रकार आदिनाथ हरवंदे यांचे निधन मंगळवार ६ डिसेंबर २०२२ रोजी रात्री ८.४४ मिनीटांनी ठाण्यातील त्यांच्या राहत्या घरी झाले. गेले वर्षभर ते कर्करोगाशी झुंज देत होते. ते ७८ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी गीता, मुलगा अनिल, मुलगी डॉ. प्रज्ञा, जावई, सुन आणि नातवंडे असा परिवार आहे. ठाण्यातील जवाहरबाग स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.



हरवंदे हे रत्नागिरीच्या जांभारी गावचे. त्यांनी औद्योगिक विकास व गुंतवणूक महामंडळात', अर्थातच सिकॉमच्या जनसंपर्क विभागात एकतीस वर्षे नोकरी केली. ते २००२ साली सिकॉमच्या जनसंपर्क विभागाचे प्रमुख, वरिष्ठ व्यवस्थापक पदावरून निवृत्त झाले. सिकॉमच्या पूर्वी त्यांनी मंत्रालयातील वित्त विभागात १९६५ ते १९७१ पर्यंत नोकरी केली. १९७५ पासून लोकप्रभा, लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, सामना, लोकमत, नवशक्ती, वृत्तमानस इत्यादी वृत्तपत्रे आणि नियतकालिकांमध्ये क्रीडा, उद्योग, नाटक, चित्रपट आणि पर्यटन इत्यादी विषयांवर सातत्याने लेखन केले. क्रीडा क्षेत्र त्यांच्या विशेष आवडीचे. क्रिकेट परीक्षणासाठी त्यांनी देशांतर्गत आणि देशाबाहेर अनेक दौरे केले. त्यांनी धावपटू, विश्वचषक क्रिकेटचा जल्लोष, कसोटी क्रिकेट ते एकदिवसीय क्रिकेट, खेलरत्न महेंद्रसिंग धोनी, चौसष्ट घरांचा बादशहा - विश्वनाथ आनंद अशी क्रीडासंदर्भात पुस्तके लिहिली. पैकी कसोटी क्रिकेट ते एकदिवसीय क्रिकेट ह्या पुस्तकाला राज्य शासनाचा राजर्षि शाहू महाराज पुरस्कार प्राप्त झाला आहे.


दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज आयोजित

दिवा शहरातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी
दिवा शहर मर्यादित
चित्रकला स्पर्धा २०२२
प्रवेश निःशुल्क

- ही चित्रकला स्पर्धा दोन गटांत असेल.
- दिवा शहर व दिवा प्रभाग समिती हद्दीतील पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा खुली आहे.
- भाग घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांना दिवा न्यूजचे स्पर्धा प्रमाणपत्र आणि विजेत्यांना आकर्षक बक्षिसे!

गट-अ : इयत्ता पहिली ते चौथी
गट-ब : इयत्ता पाचवी ते नववी
विषय : १) **निसर्ग चित्र**
२) **स्मरण चित्र**
३) **माझे शहर** (संकल्प चित्र)

दिव्यातील विद्यार्थ्यांनी व पालकांनी अधिक माहितीसाठी खालील पत्त्यावर किंवा क्रमांकावर संपर्क करा
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशचंद्र अपार्टमेंट मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-६१२.
मो. +९१ ९०२९७ ५७०९१

स्पर्धेचे नियम
- आर्ट वर्क -A4 किंवा A3 आकारात असावे.
- चित्र कोणत्याही कोऱ्या कागदावर काढता येईल.
- चित्रासाठी कोणतेही माध्यम वापरता येईल.उदाहरणार्थ, जलरंग, ॲक्रेलिक, क्रेऑन चारकोल, रंगीत पेन्सिल, तैलरंग, स्केचपेन इत्यादी.
- चित्र प्रत्यक्ष किंवा व्हाट्सअप मेसेज द्वारे पाठवू शकता. पाकिटावर किंवा व्हाट्सअप मेसेज करताना चित्रकला स्पर्धेसाठी असा उल्लेख असावा.
- चित्र तुम्हाला सुचलेले आणि स्वतंत्र असावे.

उत्कृष्ट चित्रांना दिशादर्शक, मार्गदर्शक! दिवा न्यूज च्या अंकामधून प्रसिद्धी दिली जाईल.

चित्रासोबत तुमचे पूर्ण नाव, पत्ता, इयत्ता, संपर्क क्रमांक लिहावा!
चित्र पाठवण्याची अंतिम तारीख २१ डिसेंबर २०२२
परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील! - संपादक,दिवा न्यूज

